ऑगस्ट, २०१९ मध्ये सांगली, कोल्हापूर व इतर जिल्ह्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जलसंपदा विभागाच्या हानी झालेल्या कामांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी अल्प कालावधीच्या निविदा सुचना प्रसिद्धीबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र.- पुरनि - २०१९/प्र.क्र.२८१/ सिं.व्य.(म.)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- ०४ सप्टेंबर, २०१९.

<u>वाचा</u>:- १) सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र. विअसु २०१५ / प्र.क्र.२१८/इमारती-२, दि.१६.१२.२०१५ व दि. १४.०८.२०१९.
२) महसूल व वन विभागाचे दि. २०.०८.२०१९ चे पत्र क्र. सीएलएस-२०१९/प्र.क्र. १६५/ म-३.

<u>प्रस्तावना :-</u>

सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागाकडे सोपविलेली कामे सुलभ रितीने पार पाडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावलीच्या परिशिष्ट- ४२ मध्ये परिशिष्ठ - अ मध्ये दि.१५ डिसेंबर २०१५ च्या शासन निर्णयानुसार वित्तीय अधिकारात सुधारणा करण्यात आल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम नियमावलीच्या परिशिष्ठ - ४२ मधील अ.क्र.१९ नुसार निवडक कंत्राटदारांकडून निविदा मागविण्याचा अधिकारांतर्गत मुख्य अभियंता स्थापत्य व विद्युत व अधीक्षक अभियंता (स्थापत्य व विद्युत) यांना काही अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ चा शासन निर्णय दि. १४.०८.२०१९ अन्वये सुधारित अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सदर महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील सुधारणा जलसंपदा विभागासही लागू झालेली आहे.

जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आणीबाणीच्या वेळी जसे की कोल्हापूर पद्धती बंधाऱ्याचा भराव वाहून जाणे, प्रस्तंभ तुटणे, कालवा फुटणे, धरणाचे मातीकाम बांधकामाला क्षती पोहोचणे, पुलाचा भराव वाहून जाणे इत्यादी अचानकपणे उद्भवलेली कामे अशावेळी अत्यंत तातडीने कामे हाती घेऊन पूर्ण करावी लागतात.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक :- सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/ इमा- २ दि.२७/०९/२०१८ नुसार रु.३ लक्ष किंमतीवरील कामांसाठी ई - निविदा पद्धती अनुसरून जाहीर प्रसिद्धी पत्रकांद्वारे निविदा मागवून पुढील कार्यवाही करणे बंधनकारक आहे. उपरोक्त नमूद कार्यपद्धती अवलंबताना क्षेत्रीय स्तरावर अडचणी उद्भवत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. ऑगस्ट २०१९ मध्ये उद्भवलेल्या पूर परिस्थितीमध्ये उपरोक्त प्रकारची कामे अशा वेळी त्वरेने हाती घेण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर मर्यादित अधिकार असल्याने अडचणी उद्भवत असल्याची बाब क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे.

चालू २०१९-२० या आर्थिक वर्षात, विशेषत: सांगली, कोल्हापूर व इतर जिल्ह्यामध्ये झालेल्या अमर्यादित अतिवृष्टीमुळे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, कालवे, धरणे, उपसा सिंचन योजना इत्यादी जलसंपदा प्रकल्प यांना झालेली क्षती निदर्शनास आली आहे. जलसंपदा प्रकल्पांना झालेल्या क्षतीपासून जनजीवन सुरळीत करणेसाठी, तात्काळ दुरुस्ती करणे तसेच धरण सुरक्षा व सिंचन व्यवस्थापन सुरळीत करणे अत्यावश्यक आहे. यास्तव उपरोक्त कामांची तातडीने करावयाच्या दुरुस्तीची निकड, जलसंपदा बांधकामांचे स्वरुप, पाणीसाठ्याची आत्यंतिक गरज इत्यादी बाबी लक्षांत घेता उपरोक्त कामांच्या तातडीच्या कार्यपूर्तीसाठी सदर संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात उचित व अंशत: बदल करुन क्षेत्रीय अधिका-यांना खालील सुधारित अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

दि.१९.०८.२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उप समितीच्या बैठकीतील इतिवृत्तामधील अ.क्र. १४ नुसार यास मान्यता मिळालेली आहे. या अनुषंगाने निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

उपरोक्त बाबींचा विचार करुन अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे जलसंपदा विभागाच्या हानी झालेल्या दुरुस्ती कामांना मंजुरी देण्याचे अधिकार पुढीलप्रमाणे राहतील.

कार्यकारी संचालक -- कामांची प्रापण सूची मंजूर करणे.

तांत्रिक मंजुरी - मुख्य अभियंता - रु. २५०.०० लक्ष.

अधीक्षक अभियंता - रु. १००.०० लक्ष रक्कमेच्या मर्यादेत.

कार्यकारी अभियंता - रु. ५०.०० लक्ष रक्कमेच्या मर्यादेत.

सदरची कामे ही आपत्कालिन, अतितातडीची असल्यामुळे तसेच रब्बी हंगाम सुरु होण्यापूर्वी पाणीसाठा निर्माण करणे, सिंचन व्यवस्थापन सुरळीत करणे, पुराने क्षतिग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना योग्यवेळी सिंचनाचा लाभ मिळवून देणे अशा व्यापक जनहिताचा विचार करुन शासन अल्प कालावधीची निविदा सूचना ई-निविदा पद्धतीने राबविण्यास मान्यता देत आहे. निविदा सूचनेचा कालावधी ३ दिवस इतका राहिल.

सदरहू कामे पुढील अटी व शर्तीच्या आधीन राहून हाती घेण्यात यावीत.

१) सन २०१९ मधील महापुरामध्ये हानी पोहोचलेल्या कामांची एकत्रित यादी सर्व महामंडळांनी प्रापण सूचीस मान्यता देऊन शासनास सादर करावी.
२) सन २०१९ मधील महापुरामध्ये हानी पोहोचलेले प्रत्येक काम संबंधित अधीक्षक अभियंता यांनी साक्षांकित/ प्रमाणित करावे.
३) सदरहू शासन निर्णय हा जुलै व ऑगस्ट, २०१९ मध्ये हानी झालेल्या जलसंपदा विभागाच्या कामांच्या तातडीच्या दुरुस्तीपुरताच मर्यादित राहील कामांच्या निविदा सूचना ३० सप्टेंबर, २०१९ पूर्वी निर्गमित होणे आवश्यक आहे व काम पूर्ण करण्याचा कालावधी दि. ३१ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत राहिल.

४) दि. १७.११.२०१६ च्या शासन निर्णयानुसार महामंडळांस प्राप्त होणाऱ्या पाणीपट्टीमधून या कामांवर खर्च करण्यात यावा. जर केंद्र शासनाकडून वा इतर लेखाशिर्षामधून निधी उपलब्ध झाल्यास महामंडळांना यथावकाश वर्ग करण्यात येईल.

५) पावसाळा कालावधी संपण्यापूर्वी कामे पूर्ण करुन जलाशयातील पाणी साठवण क्षमता निर्माण करुन घेणे, ही जबाबदारी संबंधित अधीक्षक अभियंता यांची राहिल.

ही कार्यप्रणाली पूर व अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या सिंचन प्रकल्पांच्या भागापुरती मर्यादित असेल. नियमित स्वरुपाच्या देखभाल दुरुस्ती व परिरक्षण कामांचा यात समावेश नाही.

या कामांना प्रशासकिय मान्यतेची आवश्यकता नाही. तथापि, कामांच्या प्रापणसुचीला कार्यकारी संचालक यांनी मान्यता दिलेली असणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्तप्रमाणे ज्या अधिकाऱ्यांच्या कक्षेत तांत्रिक मान्यता किंमत आहे, त्यांनी तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी क्षेत्रीय भेटीची निरीक्षण टिप्पणी काढून ती अंदाजपत्रकास जोडावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०९०४१६१८४४२५२७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar Nageshrao Aivale

Digitally signed by Sudhakar Nageshrao Aivale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2cc5f92716ab534e424b50ac729583cabc178f93f59c9d32f0507cd1020c53d3, cn=Sudhakar Nageshrao Aivale
Date: 2019.09.04 16:29:21 +05'30'

(सु.ना. ऐवळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव/मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव.
२. मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव
३. मा.मंत्री (सा.बां)/मा.मंत्री (ग्रामविकास व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेते महाराष्ट्र विधान सभा/ विधान परिषद.
६. अ.मु.स (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (जलसंपदा)/सचिव (लाक्षेवि)/सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय
८. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अ.मु.स. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव, (लाक्षेवि) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, (प्रकल्प समन्वय) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

१५.महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१६.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई /निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१७.सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
१८. सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा विभाग
१९.सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा मंडळ
२०.सर्व उप अभियंता व कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय
२१.निवडनस्ती (सिं.व्य./म. कार्यासन)